**BJP - SHIVSENA ALLIANCE**

1, Jalaram Nagar, Vallabhabaug lane, Opp. Gandhi Market, Ghatkoper (E),
Mumbai - 400 077 • Tel.: 2514 9978, 2514 7889

कृपया प्रसिद्धीसाठी

दि.१६.एप्रिल २००९

# महागाई मुळे सामान्य माणूस त्रस्त –किरीट सोमैया

कॉग्रेस राजवटीत महागाई भडकली असून या महागाईत सामान्य माणूस भरडला जात आहे व त्याची प्ररिणीती मतदानाच्या दिवशी नक्की दिसेल असा विश्वास ईशान्य मुंबईतील भाजपा-शिवसेना युतीचे उमेदवार डॉ.किरीट सोमैया यांनी भांडुप येथे व्यक्त केला.

सोमैया भांडुप गावात प्रचार करतांना बोलत होते. आपल्या भाषणासाठी जीवन आवश्यक वस्तुची पाकीटे मतदारांना दाखवत सोमैया मतदारांना आपला मुद्दा पटवून देत होते. गावात जवळच असलेल्या किराणा मालाचा दुकानात मतदारां सोबत जीवन आवश्यक वस्तुंचे भाव त्यांनी विचारले व तया वेळी खालील माहीती मिळाली.

| | | | |
|---|---|---|---|
| तूर डाळ | : रु.५२/-प्रति किलो | साखर | : रु.२८/-प्रति किलो |
| तांदूळ | : रु.२१/-प्रति किलो | गहू | : रु.२२/-प्रति किलो |
| शेंगदाणे तेल | : रु.८१/-प्रति किलो | गुळ | : रु.३८/-प्रति किलो |
| दूध | : रु.३०/-प्रति लीटर | | |

जीवन आवश्यक वस्तुं बरोबर विजेची बीले दुप्पट झाली असल्याची माहीती सेमौया यांनी दिली.

ईशान्य मुंबईत प्रचाराचे वातावरण आता चांगलेच गरम होत आहे. डॉ. किरीट सोमैया यांनी आपल्या प्रचाराची दुसरी फेरी सुरु केली असून रोज सकाळी ७.०० वाजल्या पासून प्रभात फेरी, चौक सभा, रेल्वे स्टेशन वर जाऊन जनसंपर्क, सोसायटी मिटींग व पदयात्रा अशा विभिन्न उपक्रमांद्वारे सोमैया मतदारांशी संवाद व संपर्क साधून आहेत.

डॉ.किरीट सोमैया यांचा “डाऊन टू अर्थ“ प्रचाराचा पद्धतीला मतदारांकडुन चांगला प्रतिसाद मिळत आहे. आपल्या प्रचारात सोमैया मतदारांना “रियॅलीटी शो“ प्रमाणे अन्नधान्यांची पाकिटे दाखवून वाढलेल्या महागाईबद्दल लोकांना जागृत करतात. लोक ही - **यावेळी बदल हवाच** - अशा पद्धतीने सोमैयांना दाद देतात.

सोमैया यांनी आपल्या रथाचे नाव **जनसुरक्षा रथ** असे ठेवले असून त्यांचा प्रचाराचा भर वाढती महागाई, लोड शेडिंग, मध्य रेल्वे च्या कारभारात सुधारणा, केंद्र शासनातर्फे होणारी मुंबईची अवहेलना, आर्थिक मंदी व तिचावर उपाय व आतंकवादाला आळा घालण्यात सरकारचे अपयश आदी विषयांवर असतो

**दयानंद नेने**
**9004028575**



N-E Mumbai Candidate : Kirit Somaiya